# महाराष्ट्र शासन
# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
## DIRECTORATE OF MEDICAL EDUCATION & RESEARCH
**Govt. Dental College & Hospital Building, St. George's Hospital Compound, Mumbai - 400 001.**
**Tel. No. +91-22-22620361-65/22652257/59** **Telegram:" MEDUCATNSEARCH"**
**Fax: +91-22-22620562/22652168** **Website: http://www.dmer.org**


क्र.संवैशिवसं/एमएचटी-सीईटी-२००९/रिक्त जागा/बीएएमएस व इतर/प्रवेश/सूचना/१-अ, दिनांक : १५/१०/२००९

प्रति,
प्राचार्य,
१. सर्व शासकीय / महानगरपालिका / शासन अनुदानीत
आयुर्वेद / युनानी / फिजीओथेरपी / ऑक्युपेशनलथेरपी/ बीएएसएलपी / बी.पी.ॲन्ड ओ. / बी.एस.सी. (नर्सिंग)
२. चैतन्य मेडीकल फाऊंडेशन फिजीओथेरपी महाविद्यालय, पुणे.
३. पी.ई.एस. मॉडर्न कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, पुणे.
४. श्री.भगवान कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, औरंगाबाद.

विषय : एमएचटी-सीईटी-२००९
दिनांक १२/१०/२००९ रोजी नंतर रिक्त राहिलेल्या जागा भरणेबाबत.

आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या आयुर्वेद / युनानी / फिजीओथेरपी / ऑक्युपेशनलथेरपी / बीएएसएलपी / बी.पी.ॲन्ड ओ. / बी.एस.सी. (नर्सिंग) या अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांमधील दिनांक १२ ऑक्टोबर, २००९ नंतर रिक्त असणाऱ्या जागांवर प्रवेशासाठी संचालनालयामार्फत दिनांक १४/१०/२००९ रोजी वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देण्यात आली आहे. सदर नोटिफीकेशनद्वारे जे विद्यार्थी आपल्या महाविद्यालयामध्ये प्रवेश घेण्यास ईच्छुक आहेत त्यांना स्वतंत्रपणे आपल्या महाविद्यालयासाठी अर्ज करण्याबाबत सुचीत करण्यात आले आहे. महाविद्यालयांमधील रिक्त जागांचा संवर्गनिहाय तक्ता संचालनालयाच्या www.dmer.org या संकेतस्थळावर विद्यार्थी व पालकांसाठी प्रकाशित करण्यात आलेला आहे. या प्रवेश प्रक्रियेसाठी खालीलप्रमाणे सूचना आहेत.

| क्र. | सूचना | वेळापत्रक |
|---|---|---|
| १. | महाविद्यालयनिहाय रिक्त जागांचा तक्ता संचालनालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध राहील. (www.dmer.org) | २१ ऑक्टोबर २००९ |
| २. | विद्यार्थ्यांनी व्यक्तिशः त्यांना हव्या असलेल्या महाविद्यालयात प्रवेशासाठी अर्ज करावयाचा कालावधी.(एमएचटी-सीईटी २००९ च्या गुणपत्रिकेची आणि सर्व आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या छायाप्रतींसह) | २२ ऑक्टोबर २००९ ते २६ ऑक्टोबर २००९ |
| ३. | महाविद्यालयाने त्यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जांमधून गुणवत्ता यादी तयार करुन ती महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रकाशित करणे. | २७ ऑक्टोबर २००९ (सकाळी ११.०० वाजता) |
| ४. | निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात रुजू होण्याचा कालावधी | २९ ऑक्टोबर २००९ पर्यंत |
| ५. | सदर मुदतीनंतर रिक्त राहीलेल्या जागावर दिनांक २७ ऑक्टोबर २००९ रोजीच्या गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी. सदर प्रक्रियेच्या वेळी विद्यार्थ्यांकडे सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे आणि शैक्षणिक शुल्क असणे आवश्यक आहे. | ३० ऑक्टोबर २००९ सकाळी ११.०० वाजता |
| ६. | प्रवेशाचा अंतिम दिनांक (बी.एस.सी नर्सिंग अभ्यासक्रम वगळून) | ३१ ऑक्टोबर २००९ |
| ७ | प्रवेशाचा अंतिम दिनांक (फक्त बी.एस.सी नर्सिंग अभ्यासक्रम) | ३० ऑक्टोबर २००९ |

बी.एस.सी. (नर्सिंग) अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयातील प्रवेशाची अंतिम दिनांक भारतीय परिचर्या परिषदेने दिनांक ३० ऑक्टोबर, २००९ पर्यंत वाढविल्याने सदर अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयातील रिक्त जागांवरील प्रवेश सुध्दा उपरोक्त तक्त्यानुसार करण्यात यावे.

उपरोक्त तक्त्याच्या अनुषंगाने प्रवेशाबाबत करावयाची कार्यवाही खालीलप्रमाणे आहे.

१) संचालनालयामार्फत संकेतस्थळावर दि.२१/१०/२००९ रोजी प्रकाशित केलेल्या संवर्गनिहाय रिक्त जागांच्या व्यतीरिक्त आपल्या महाविद्यालयात असलेल्या सर्व रिक्त जागा भरण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी.

२) आपल्या महाविद्यालयातील रिक्त असणाऱ्या जागांवरील प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी अर्ज करावयाची मुदत दिनांक २२/१०/२००९ ते २६/१०/२००९ अशी देण्यात आली आहे.

३) उपरोक्त मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जामधुन विद्यार्थ्यांची संवर्गनिहाय गुणवत्ता यादी तयार करून सदरची यादी आपल्या संस्थेच्या सूचना फलकावर दिनांक २७ ऑक्टोबर, २००९ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत जाहिर करावी.

४) रिक्त जागांवर संवर्गनिहाय प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची निवड यादी त्याच दिवशी म्हणजे दिनांक २७ ऑक्टोबर, २००९ रोजी सूचना फलकावर जाहिर करावी.

५) निवड यादीतील विद्यार्थ्यांनी दिनांक २९ ऑक्टोबर, २००९ पर्यंत प्रवेश घेणे बंधनकारक आहे. प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्याकडून त्याची सर्व मूळ प्रमाणपत्रे प्राप्त करून घ्यावीत.

६) सदर कालावधीत जे विद्यार्थी प्रवेश रद्द करतील त्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कातून फक्त रूपये १,०००/- इतकी रक्कम कपात करून उर्वरित सर्व रक्कम त्यांच्या मूळ प्रमाणपत्रांसहीत विद्यार्थ्यास त्वरीत परत करावीत.

७) दिनांक २९ ऑक्टोबर, २००९ पर्यंत निवड यादीतील विद्यार्थ्यांनी प्रवेश न घेतल्यास आपल्यामार्फत जाहिर करण्यात आलेल्या यादीतील पुढील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा. दिनांक २२ ऑक्टोबर, २००९ ते २६ ऑक्टोबर, २००९ रोजी दरम्यान आपल्या महाविद्यालयात प्रवेश रद्द केल्यामुळे रिक्त झालेल्या जागा सुध्दा दिनांक २७ ऑक्टोबर, २००९ च्या गुणवत्ता यादीप्रमाणे त्या त्या संवर्गानुसार भरण्यात याव्यात.

८) प्रवेशासाठी विद्यार्थ्याने प्रत्यक्ष हजर रहाणे गरजेचे आहे याबाबत विद्यार्थ्यास स्पष्ट कल्पना दयावी.

९) एखादया मागास संवर्गातील रिक्त जागांसाठी अर्ज प्राप्त न झाल्यास सदरची जागा एमएचटी-सीईटी-२००९ प्रेफरन्स प्रक्रियेच्या माहिती पुस्तिकेमध्ये दिलेल्या नियमांप्रमाणे भरण्यात यावी. (पान क्र.४ व ५, प्रत सोबत जोडली आहे.)

याबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील मागास सवर्गासाठी राखीव असणाऱ्या जागेवर त्या संवर्गाचा उमेदवार उपलब्ध नसल्यास सदरची जागा भरण्याकरिता खालील प्रमाणे पध्दती अनुसरावी.

- आरक्षित प्रवर्गांची पुढील तीन गटांमध्ये विभागणी करावी.

| | |
|---|---|
| १. गट - अ : | सदर गटामध्ये अनुसूचित जाती (एस.सी.) व अनुसूचित जमाती (एस.टी.) मधील विद्यार्थ्यांचा समावेश राहील. |
| २. गट - ब : | सदर गटामध्ये निरधिसूचित जमाती-ए (व्ही.जे.) व भटक्या जमाती-बी (एन.टी. -१) मधील विद्यार्थ्यांचा समावेश राहील. |
| ३. गट - क : | सदर गटामध्ये भटक्या जमाती-सी (एन.टी.-२), भटक्या जमाती-डी (एन.टी. -३) व इतर मागासवर्गातील विद्यार्थ्यांचा समावेश राहील. |

- उपरोक्त कोणत्याही गटातील राखीव विद्यार्थी उपलब्ध नसल्यास, त्याच गटामधील अन्य राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांमधील आपसातील गुणवत्तेच्या आधारे एखाद्या विद्यार्थ्यास प्रवेश देवून ती जागा भरण्यात यावी.

- त्याच गटातील एखाद्या विद्यार्थ्यांमधील प्रवेश देवून एखादी जागा भरता येणे शक्य नसल्यास, ती जागा रिक्त जागांमध्ये सामाविष्ट करण्यात यावी आणि अन्य कोणत्याही राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांमधून तयार केलेल्या गुणवत्ता यादीमधून अन्य कोणत्याही गटामधील राखीव प्रवर्गातील उपलब्ध असलेल्या विद्यार्थ्यांला प्रवेश देवून ती जागा भरण्यात यावी.
- कोणत्याही राखिव गटातील विद्यार्थ्यास प्रवेश देवून एखादी जागा भरणे शक्य नसल्यास ती जागा, राखीव प्रवर्गात असलेल्या उमेदवारांव्यतिरिक्त म्हणजेच खुल्या संवर्गातील अन्य विद्यार्थ्यांना आपसातील गुणवत्तेच्या आधारे प्रवेश देवून भरण्यात यावे.

आपल्या महाविद्यालयातील रिक्त असणाऱ्या जागेवर प्रवेश देताना उपरोक्त सूचनांप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे. याबाबत कोणतीही शंका अथवा संभ्रम असल्यास त्यासाठी संचालनालयाच्या सीईटी कक्षास दुरध्वनी वरून त्याबाबत विचारणा करावी. (०२२-२२६५२२५१/५९ / २२६२०३६१ - ६५ विस्तारीत क्र.३२३, ३१७)

या बाबत आपणास असेही कळविण्यात येत आहे की, सदर प्रवेश प्रक्रिया उपरोक्त नियमानुसार करण्याकरीता आपल्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन प्रवेशाच्या कार्यवाहीबाबत पुढील उपाययोजना करणे बंधनकारक आहे. भविष्यात आपण केलेल्या प्रवेशाबाबत कोणतीही तक्रार अथवा गुंतागुंत निर्माण झाल्यास त्याकरिता आपले महाविद्यालय सर्वस्वी जबाबदार राहील.

**सही/-**
**सक्षम प्राधिकारी व संचालक,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**